MHNS160010862025

## कौ.हिं.म.सं.अ. अर्ज क्रं.५०/२०२५ नि. क्रं.०४ खालील आदेश
## दिनांक २९/०४/२०२६

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने अंतरीम आर्थिक लाभ मिळण्यासाठी कौंटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

### अर्जदाराच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहेः–

०२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह ता. २/५/२०२४ रोजी मौजे खडकजांब, ता. चांदवड, जि. नाशिक येथे हिंदु धर्मशास्त्र व समाजातील जाती रिवाजाप्रमाणे झालेला असून सदरचे विवाह संबंधामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचेत पतीपत्नी असे नातेसंबंध निर्माण झालेले असून ते आजपावेतो कायम असून सदरचे विवाह संबंधातुन अर्जदार हीस गैरअर्जदार क्र. १ पासून काहीएक अपत्य झालेले नाही अगर आजमितीस गरोदर नाही. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे विवाहाचा संपुर्ण खर्च अर्जदार हीचे आईवडीलांनी केलेला असून गैरअर्जदार क्र.१ याचे विवाहाकामी अर्जदार हीचे वडीलांना सुमारे ४–५ लाख रूपये इतका खर्च केलेला आहे असे कथन केले आहे.

०३. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जातील गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ हीचा पती असून गैरअर्जदार क्र.२ हे गैरअर्जदार क्र.१ वडील असून अर्जदाराचे सासरे आहे तसेच गैरअर्जदार क्र.३ ही गैरअर्जदार क्र.१ ची आई असून अर्जदाराची सासु आहे. गैरअर्जदार क्र.४ हा गैरअर्जदार क्र.१ चा मामा आहे असे कथन केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झाल्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांचे एकत्र कुटूंबात नांदणेस गेली व गैरअर्जदार

क्र.१ बरोबर संसार करू लागली. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ बरोबर संसार करीत असताना गैरअर्जदार क्र.३ ही नेहमी अर्जदाराविषयी गैरअर्जदार क्र.१ चे कान भरवित असत व गैरअर्जदार क्र.१ हा गैरअर्जदार क्र. ३ चे ऐकुन अर्जदार हीस नेहमी रात्रीबेरात्री मारहाण करीत असत तसेच गैरअर्जदार क्र.४ हा देखील गैरअर्जदार क्र.१ ते३ यांचे घरी अधुन मधुन येत असत व गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे अर्जदार ही म्हणत असत की, तुझे आईवडीलांनी लग्न चांगले करून दिले नाही, भिकारड्या सारखे लग्न करून दिले नाही, लग्नात आमचा व आमचे पाहुणेरावळ्याचा मानपान ठेवला नाही, तरी तु तुझे माहेरून रक्कम रूपये ५० हजार किराणा दुकानाचे भांडवलासाठी घेऊन ये तर आम्ही तुला नांदवु नाही तर फारकत देऊन टाक असे म्हणत असत, तेव्हा अर्जदार ही गैरअर्जदार यांना समजावुन सांगत असत की, माझे आईवडीलांची परिस्थिती गरीबीची आहे, त्यांनी माझे लग्न तर नातेवाईकांकडून व लोकांकडून हातउसनवार पैसे घेऊन करून दिलेले आहे त्यामुळे ते तुमचे मागणीप्रमाणे पैसे देऊ शकणार नाही व मी आईवडीलांकडे पैसे मागणार नाही असे समजावुन सांगत असत याचा गैरअर्जदार यांना राग येत असत व त्या कारणावरून गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हीस सतत दारू पिवुन रात्रीबेरात्री मारहाण करीत असत व घराचे बाहेर हुसकावुन देत असत अशाही परिस्थितीमध्ये अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ बरोबर प्रामाणिकपणे संसार करीत होती असे कथन केले आहे.

**०४.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ बरोबर संसार करीत असताना गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदार हीस म्हणत असत की, तु चांगला स्वयंपाक करीत नाही, भांडीकुंडी निट धुत नाही, या कारणावरून गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदार हीस वेळेवर जेवण देत नसत व तीस अर्धपोटी उपाशी ठेवीत असत, तसेच गैरअर्जदार क्र.१ व ३ हे नेहमी अर्जदार

हीचे चारित्र्यावर संशय घेत असत अर्जदार हीस शेजारी–पाजारी यांचेशी बोलु देखील देत नसत. त्याचप्रमाणे गैरअर्जदार यास जबरदस्त दारूचे व्यसन आहे, दारूच्या व्यसनात गैरअर्जदार क्र. १ हा नेहमी अर्जदार हीस दारू पिवुन मारहाण करीत असत तसेच गैरअर्जदार क्र. ३ ही अर्जदार हीस म्हणत असत की, तो दारू पितो, त्याचे बरोबर संबंध ठेवु नको असे म्हणत असत असे कथन केले आहे.

**०५.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी सतत शारिरीक व मानसिक छळ करून अर्धपोटी उपाशी ठेवुन सतत माहेरून रक्कम रूपये ५० हजार घेऊन ये या कारणावरून कौटूंबिक हिंसाचार केलेला आहे व अर्जदार हीस वेळोवेळी मारहाण करून शारिरीक व मानसिक छळ केला म्हणून अर्जदार हीने गैरअर्जदार यांचे विरूध्द वडनेरभैरव पोलीस स्टेशनला प.ना.का.क्र.११०/२०२५ प्रमाणे ता.५/६/२०२५ रोजी फिर्याद दाखल केलेली आहे असे कथन केले आहे.

**०६.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हीस सतत माहेरून रक्कम रूपये ५० हजार घेऊन ये तरच नाव नाही तर फारकत देवून टाक या कारणावरून गैरअर्जदार न.१ हा दारू पिवुन अर्जदार हीस मारहाण करीत असत व ता. २/५/२०२४ रोजी रोजी विवाह झाल्यापासून ता. २७/१/२०२५ पावेतो वेळोवेळी अर्जदार हीस मारहाण करून एकावस्त्रानिशी माहेरी हुसकावुन दिले व अर्जदाराचे अंगावरील दागदागिणे बळजबरीने काढुन घेतले त्यामुळे अर्जदार ही नाईविलाजास्तव माहेरी राहत आहे. गैरअर्जदारचे सततचे शारिरीक व मानसिक छळामुळे अर्जदाराचे शारिरीक क्षमतेवर परिणाम झालेला असून अर्जदारास काहीएक कामधंदा होत नाही, तसेच अर्जदारास स्वतःचे उत्पन्नाचे देखील साधन नाही. अर्जदार तिचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ

आहे. याउलट गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली असून गैरअर्जदार क्र.१ यांचा किराणा दुकानाचा व्यवसाय असून त्यापासून दरमहा रक्कम रूपये ६० ते ७० हजार रूपये निव्वळ उत्पन्न मिळते त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यांची अर्जदार हीस दरमहा रक्कम रूपये १०,०००/– व घरभाडे रक्कम रूपये ३०००/– देण्याची ऐपत आहे म्हणून अर्जदार यांनी प्रस्तुतचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे दाखल केला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. गैरअर्जदारांवर रितसर बजावणी होवुन ते प्रकरणात हजर झाले व गैरअर्जदार क्रं. १ ते ३ यांनी नि.क्रं.१३ अन्वये त्यांचा जबाब दाखल केला. गैरअर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदाराचा अर्ज खरा, योग्य व कायदेशीर नसुन तो गैरअर्जदार यांना मुळीच मान्य व कबूल नाही असे कथन केले आहे. गैरअर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह ता. ०२/०५/२०२४ रोजी खडकजांब, ता. चांदवड, जि. नाशिक या गांवी हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे व जातीरिवाजाप्रमाणे झालेला असुन या विवाहाचा खर्च उभयतांनी केलेला आहे असे कथन केले आहे.

०८. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार हि सामनेवालेंकडे वडाळी नजीक येथे येऊन एकत्रात नांदु लागली. गैरअर्जदार यांचे एकत्र कुटुंब असुन गैरअर्जदार हा शेती व्यवसाय करतो. अर्जदार गैरअर्जदारकडे नांदत असतांना शेतीचे कामे करणेस नकार देत असे. तसेच म्हणत असे की, मला एकत्र कुटुंबात रहाणे आवडत नाही. तुम्ही नोकरी करा आणि तुमचे एकत्र कुटुंबातुन विभक्त रहा," असे अर्जदार गैरअर्जदार क्र. १ यास म्हणुन गैरअर्जदार क्र. १ यास लग्नानंतर मानसिक त्रास देत असे. गैरअर्जदार क्र. १ हा सुशिक्षित

असुन त्याला नोक–या मिळत नाही. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास सांगितले की आजमितीला आपण शेतीचा व्यवसाय करतो. तोच व्यवसाय मी करेल आणि जर नोकरी मिळाली तर नोकरीही करेन. दरम्यानचे काळात गैरअर्जदार क्र. १ याला नोकरी मिळाली व तो नोकरी करू लागला. तेव्हा अर्जदार हिने समानेवाला क्र. १ यास दि. २४/०१/२०२५ रोजी माझी आई आजारी आहे असे सांगुन गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास माहेरी सोडावे असे सांगितले. त्या प्रमाणे गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास तिचे माहेरी नेऊन घातले. तदनंतर अर्जदार ही माहेरी राहीली. ३–४ दिवसाने तिने फोन केला. गैरअर्जदार क्र. १ यास अर्जदाराने घेण्यास बोलाविले. मात्र गैरअर्जदार क्र. १ याने, मी कामावर आहे, वेळ मिळाल्यावर येतो असे सांगितले. त्यावेळी अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ यास उध्दटपणे शिविगाळ केली, तु, तुझे कुटुंब माजले आहे, तु नांदणेस घेणेस आला तर मी येईन, नाहीतर मी येणार नाही असे म्हणुन गैरअर्जदार क्र. १ व ३ यांना अर्वाच्च्य व बिभित्स शिविगाळ केली. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारास घेणेस गेला असता अर्जदाराने नांदणेस येणेस नकार देवुन आपली भेट आता कोर्टातच असे सांगुन तिने व तिचे माहेरचे लोकांनी गैरअर्जदार व त्याचेबरोबर आलेले लोकांना अपमानास्पद वागणुक देवुन परत पाठविले असे कथन केले आहे.

०९. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार गैरअर्जदारकडे नांदत असतांना ती गरोदर राहिली. परंतु गर्भाची वाढ होणार नाही असे सांगितल्याने डॉक्टरांनी गर्भपात करणेचा सल्ला दिला व उभयतांचे संमतीने गर्भपात करणेत आला. दि. २४/०१/२०२५ नंतर दि. १५/०२/२०२५ पावेतो गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारास नांदणेस आणणेसाठी खुप प्रयत्न केले. परंतु अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना अपमानास्पद वागणुक देवुन दरवेळेस परत पाठविले. गैरअर्जदार क्र. १ हा तरूण आहे, त्यास संसार सुखाची व

सहवास सुखाची गरज आहे. परंतु अर्जदाराने माहेरचे लोकांचे नादी लागुन गैरअर्जदार क्र. १ याचेपासुन विभक्त राहुन त्यास संसार सुख देणेस नकार दिला आहे व उलट गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांना जेलमध्ये बसविण्याची धमकी दिलेली आहे. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास दि. १७/०२/२०२५ रोजी नोटीस पाठविली. ती नोटीस मिळूनही अर्जदार नांदणेस आली नाही. यावरून अर्जदारास गैरअर्जदारबरोबर संसार करणेची इच्छा राहिली नाही हे स्पष्ट होते आहे असे कथन केले आहे.

**१०.** गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हे आजही अर्जदारासोबत संसार करण्यास तयार व उत्सुक होते व आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदाराने त्यांचेकडे नांदणेस यावे म्हणुन निफाड येथील न्यायालयात एच एम पी क्र.२४२/२०२५ दाखल केलेला आहे. अशाप्रकारे अर्जदार हिने कोणतेही संयुक्त कारण नसतांना गैरअर्जदार क्र. १ याचा त्याग करून सदरचा खोटया, कपालेकल्पीत मजकुराचा अर्ज दाखल केलेला आहे असे कथन केले आहे.

**११.** गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ याची अर्जदारासोबत प्रामाणिकपणे संसार करणेची ईच्छा आहे. गैरअर्जदार क्र. १ याची अर्जदार हिने यापुर्वी ज्या ज्या चुका केलेल्या आहेत, त्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा नव्याने चांगला संसार करणेची प्रामाणिक ईच्छा व अपेक्षा बाळगुन आहे. परंतु अर्जदार हिने वर नमुद कारणास्तव कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण नसतांना गैरअर्जदार क्र. १ चा त्याग करून अर्जदार तिचे माहेरी राहत आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कौटूंबिक अगर कोणताही मानसिक, शारिरीक छळ केलेला नाही. केवळ अर्जदाराच्या पैशांच्या अवास्तव मागण्या गैरअर्जदार याने पुर्ण

करावा यासाठी गैरअर्जदारवर दबाव निर्माण करणेसाठी अर्जदाराने सदरचा खोटा, चुकीचा बेकायदेशीर अर्ज दाखल केलेला आहे व तो रद्द होणेस असुन रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

१२. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदाराचा अंतरिम अन्नवस्त्राचा अर्ज जशाच तशा उधृत करून नाकारलेला आहे. अर्जदाराचे वडीलांची खडकजांब, ता. चांदवड, जि.नाशिक येथे शेती आहे. त्यात अर्जदार हिचा देखील हिस्सा आहे. सदर शेतात गहु, ज्वारी, बाजरी व भाजीपाला अशी पिके ते घेतात. त्यापासुन अर्जदार व तिचे वडीलांना दरवर्षी ५ ते ६ लाख रूपये उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार शिवणकाम करते. त्यापासुन तिला दररोज रक्कम रू. ३००/– मिळतात. तसेच ती ब्युटीपार्लरचे काम करते त्यापासुन तिला १० ते १५ हजार दरमहा मिळतात. त्यामुळे अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करणेस सक्षम आहे. याउलट गैरअर्जदार याचे किरकोळ किराणा विक्रीचे दुकान आहे. त्यातुन त्यास अत्यअल्प उत्पन्न मिळते. त्यातुन त्याला आईवडीलांची जबाबदारी अशा अनेक जबाबदा–या आहेत. गैरअर्जदार यांना किराणा विक्रीचे व्यवसायातुन मिळणा–या तुटपुंज्या उत्पन्नातुन गैरअर्जदार याचेकडे काहीही शिल्लक राहत नाही. त्यामुळे गैरअर्जदार याची अर्जदाराला वेगळी अन्नवस्त्र देणेची ऐपत नाही. गैरअर्जदार ज्याप्रमाणे राहतो, त्याप्रमाणे अर्जदारास सांभाळणेस तयार आहे असे कथन केले आहे.

१३. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदाराच्या अर्जातील मागण्या खोटया, चुकीच्या व बेकायदेशीर असुन त्या रद्द होणेस पात्र असुन रद्द व्हाव्यात. अर्जदाराचे अंतरिम अन्नवस्त्राचे अर्जातील कथन व मागण्या खोट्या, चुकीच्या व बेकायदेशीर असुन त्या रद्द होणेस पात्र असुन रद्द करण्याची विनंती

केली आहे.

**१४.** अर्जातील कथनांवरुन खालील विचाराधीन प्रश्न माझे अवलोकनार्थ येउन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेवरुन दिले ते खालील प्रमाणे :

| अ.कं. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार हीने तिच्यावर कौटुबिक हिंसाचार झालेची बाब प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय . अर्जदाराला रक्कम रुपये ३,०००/– प्रतिमाह.** |
| ०३. | अर्जदार हे अंतरिम घरभाडे व खर्च रक्कम मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **नकारार्थी.** |
| ०४. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर .** |

**:: कारणमिमांसा ::**

**१५.** अर्ज व जबाब वाचला. अभिलेखावर दाखल कागदपत्र पाहिले. अर्जदार व गैरअर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

**विचाराधीन प्रश्न क्रं. १** :–

**१६.** जरी, अर्जातील कथने ही पुराव्यांती शाबीत होणार असली तरी, भारतीय संस्कृतीनुसार कोणतीही स्त्रीस त्रास असल्या शिवाय आपल्या पतीच्या नातेवाईकां विरुध्द विनाकारण आरोप करणार नाही व सदरचे आरोप देखील प्रथमदर्शनी कौटुंबीक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडणारी आहेत.

**१७.** अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन झालेल्या वादातीत कौटुंबिक हिंसाचाराबाबत विस्तृतपणे शपथेवर कथन केले आहे. त्यामध्ये गैरअर्जदार यांच्याकडुन अर्जदारास मानसिक त्रास देणे, शंका उपस्थीत करणे, शिवीगाळ

करणे याबाबतची कथने त्यांनी नमुद केलेली आहेत. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५, कलम ३ मध्ये दिलेल्या व्याख्या लक्षात घेता, तसेच सदर कायद्याचे ध्येय व कारणांचा विचार करता प्रथमदर्शनी अर्जदार पिडीत व्यक्ती असल्याचे दिसुन येते. करीता, **विचाराधीन प्रश्न क्रं.१ चे उत्तर होकारार्थी** देण्यात येत आहे.

**विचाराधीन प्रश्न क्रं. २ करीता** :–

**१८.** अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मुख्य अर्जाचा निकाल लागण्यास अवधी लागणार आहे. त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. करीता, अर्जदाराने स्वतःकरीता दरमहा रुपये १०,०००/– अंतरीम अर्थसहाय्य तसेच घरभाडे व इतर खर्च मंजुर होण्यास विनंती केली आहे.

**१९.** विचाराधीन प्रश्न क्रं.१ च्या निष्कर्षावरुन अर्जदाराने प्रथमदर्शनी त्या पिडीत व्यक्ती असल्याचे शाबीत केलेले आहे. त्यामुळे, अर्जदार मागणी प्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. आजरोजी गैरअर्जदार यांनी स्वतःचे मालमत्ता व दायित्व शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ यांचा किराणा दुकानाचा व्यवसाय असून त्यापासून दरमहा रक्कम रूपये ६० ते ७० हजार रूपये निव्वळ उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे मात्र उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अभिलेखावरील कथनावरुन व दाखल कागदपत्रांवरुन दिसून येते की, गैरअर्जदार यांच्याकडुन अर्जदार हीचा कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. त्यामुळे, निश्चितच कायदयातील स्थापित तत्वाव्दारे तिला सांभाळण्याची आर्थिक व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार यांचेवर आहे. मुळ अर्जाचा निकाल होण्यास अवधी लागणार असल्याने, कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५,

कलम २३ अन्वये अंतरिम आर्थिक सहाय्याचा आदेश अर्जदाराच्या लाभात करणे न्यायोचित होईल.

**२०.** सदर कायद्याचे कलम २३ अन्वये या न्यायालयास अंतरिम किंवा एकतर्फा आदेश देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ यांचा किराणा दुकानाचा व्यवसाय असून त्यापासून दरमहा रक्कम रूपये ६० ते ७० हजार रूपये निव्वळ उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. मात्र त्या बाबत अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. उपरोक्त विवेचणांवरून अर्जदार यांना आर्थिक सहाय्य करण्याची गैरअर्जदार क्रं. १ यांची कायदेशिर व नैतिक जबाबदारी आहे. अर्जदारांचे राहणीमान, सध्याचे जीवनावश्यक वस्तुंचे बाजारभाव, वैदयकीय खर्च लक्षात घेता, व सध्याचे रोजमजुरीचे दर दिवसाला रुपये ३०० ते ५०० असल्याने व गैरअर्जदार क्रं. १ शारिरीक दृष्टया अपंग नाही व तो रोजमजूरी करण्यास सक्षम आहे. त्यामुळे तो महिन्याला ९ ते १५ हजार सहज कमवू शकतो त्यामुळे तो अर्जदाराला रक्कम रुपये ३,०००/– प्रतिमाह अंतरीम आर्थिक सहाय्याचा हुकूम हा अर्ज दाखल दिनांकापासुन मंजुर करणे न्यायोचित आहे. परिणामी, **विचाराधीन प्रश्न क्रं.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी** देत आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्रं. ३ करीता</u>** :–

**२१.** अर्जदाराने ती भाडयाने राहात असल्याबाबत कोणताही भाडे करारनामा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदाराने तीला महिन्याला ३,०००/– घरभाडयाची आवश्यकता असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदाराने अभिलेखावर कोणतीही घरभाडेपावती दाखल केली नाही. अर्जदार ही भाडयाच्या घरात राहात आहे हे दाखवण्याकरिता कोणतोही घर भाडे पावती अभिलेखावर

दाखल केलेली नाही. अर्जदार ही तिचे आईवडीलांकडे राहत आहे. त्यामुळे तिला यावेळी घरभाडयाची आवश्यकता असल्याबाबत व खर्चा बाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अर्जदाराने कोणतीही घरभाडे भरल्याबाबत पावत्या अभिलेखावर दाखल केलेल्या नाहीत. अर्जदार तिचे आईवडीलांकडे राहत असल्यामुळे अर्जदार हिला भाडयाने घर घेऊन राहण्याची आवश्यकता असल्याचे व ती घर भाडे घेऊन राहात आहे ही बाब अर्जदाराने सिध्द केली नाही तसेच सदरील घरभाडे भरत आहे किंवा कसे याबाबत पावत्या व इतर सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. म्हणुन मी **विचाराधिन प्रश्न क्र.३** चे उत्तर वरील प्रमाणे नकारार्थी नोंदवित आहे व **विचाराधिन प्रश्न क्रं.४** करीता खालील आदेश पारीत करत आहे.

**– आ दे श –**

| | |
|---|---|
| (१) | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| (२) | गैरअर्जदार क्रं. १ याने अर्ज दाखल दिनांकापासुन अर्जदाराला रक्कम रुपये ३,०००/– रुपये प्रतिमाह (अक्षरी रक्कम रुपये तिन हजार रुपये) दरमहा अंतरीम आर्थिक सहाय्य म्हणून दिनांक १४/०८/२०२५ ते मुळ अर्जाचा अंतिम निकाल होई पावेतो द्यावेत. |
| (३) | सदर आदेशाची प्रत उभयपक्षांना मोफत देण्यात यावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.04.29 17:13:28 +0530

दिनांक –२९/०४/२०२६
ठिकाण – चांदवड.

**(एस. एस. छल्लाणी)**
**प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी चांदवड.**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्र.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | २९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | २९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | २९/०४/२०२६ |